



संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने   कार्यकारी संपादक : श्याम तिवारी






Sangamner | MAHMAR/2018/75654 | वर्ष ८ | अंक ४० | १३/६/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४








# चार वर्षानंतर नगरपालिका निवडणुकांचा 'शंखनाद'!

## शासनाकडून कालबद्ध कार्यक्रम जाहीर

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकांच्या वाटेतील अडसर बाजूला सारुन कालबद्ध मर्यादेत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा करताच निवडणूकपूर्व तयारीला वेग आला आहे. शासनाने राज्यातील बहुतेक सर्व महापालिका, नगरपालिका आणि मुदत संपलेल्या नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या अनुषंगाने प्रभागरचना करण्याच्या सूचना प्रसिद्ध केल्यानंतर अवघ्या ४८ तासांतच राज्यातील महापालिकांपासून नगरपंचायतींपर्यंतच्या प्रभागरचनेचे कालबद्ध वेळापत्रक जाहीर करीत निवडणुकांचा 'शंखनाद' केला आहे. त्यानुसार बुधवारपासून प्रगणक गटाची मांडणीही सुरु झाली असून २२ ऑगस्टरोजी अंतिम प्रभागरचनेची अधिसूचना प्रसिद्ध होईल. यावेळी संगमनेर नगरपालिकेच्या पूर्वीच्या प्रभागरचनेत फारसा बदल होण्याची शक्यता कमी आहे. शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यसंख्येतही वाढ केल्याने यावेळी शहरातील १५ प्रभागांमधून ३० सदस्य निवडावे लागणार असून नगराध्यक्षांची निवड मात्र जनतेतून होणार आहे.

■ डिसेंबर २०२१ मध्ये संगमनेर नगरपालिकेची मुदत संपली. तेव्हापासून पालिकेवर प्रशासकांचे राज्य आहे. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर येणाऱ्या सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धुरळा उडणार असून कार्यकर्त्यांची निवडणूक म्हणून इच्छुकांची गर्दी वाढू लागली आहे. राज्य शासनाने प्रभागरचना अंतिम करण्याचे काम हाती घेतल्याने राज्यात कोणत्याही क्षणी निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

## संगमनेरात द्विसदस्यीय पंधरा प्रभाग

गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर भाष्य करताना चार आठवड्यात निवडणुकांची अधिसूचना प्रसिद्ध करण्यासह चार महिन्यात निवडणूक प्रक्रिया राबवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले होते. त्या अनुषंगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभागरचनेची जबाबदारी असलेल्या राज्य शासनाने मंगळवारी (ता.१०) राज्यातील २९ महानगरपालिका, २४८ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आवश्यक आदेश काढले असतानाच अवघ्या ४८ तासांतच आज (ता.१२) शासनाच्या नगरविकास विभागाने सर्व जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांना कालबद्ध कार्यक्रम राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आजपासून प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून पुढील दोन महिने विधानसभेच्या मतदारयाद्यांचे विभाजन करुन प्रभागरचनेचा कार्यक्रम सुरु राहणार आहे.

नगरविकास विभागाच्या आदेशानुसार बुधवारपासून (ता.११) (पान ३ वर)

# निवडणूक आयोगाचे भाजपसाठी काम : माजी मंत्री थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या गैरप्रकाराबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण लेख लिहून सरकारला अनेक प्रश्न विचारले आहेत. यातील प्रश्नांना निवडणूक आयोग समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. भाजप व त्यांचे मित्र पक्ष सत्तेसाठी काहीही करत असून निवडणूक आयोग आता स्वायत्त राहिलेला नाही. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये सत्ताधाऱ्यांकडून मॅच फिक्सिंग करण्यात आल्याची टीका महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली.



माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिल्लीमध्ये दिलेल्या एका मुलाखतीमध्ये म्हटले आहे की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीबाबत अनेक वेळा सरकारला आणि निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले. मात्र अद्यापही निवडणूक आयोग समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी काही मंत्री उत्तर देत आहेत. हे उत्तर देण्याचे काम निवडणूक आयोगाचे आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला अत्यंत चांगले वातावरण होते. विधानसभेलाही चांगले होते. मात्र वाढलेले मतदार, शेवटच्या तासामध्ये वाढलेला मतदानाचा टक्का आणि भाजपचा १४९ जागांपैकी १३२ जागावर झालेला विजय, इतका मोठा स्ट्राईक रेट हे सर्व संशयास्पद आहे.जनतेच्या मनात आजही ईव्हीएम बाबत शंका आहे. अनेक ठिकाणी बोगस मतदान झाले. इतके मतदार वाढले कसे? काही (पान ३ वर)

# कसायांची टोळी एक वर्षासाठी हद्दपार!

## पोलीस अधीक्षक घार्गे यांची मोठी कारवाई

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

सोमनाथ घार्गे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर गोवंशीय जनावरांची कत्तल करणारी शहरातील कसायांची टोळी एक वर्षासाठी हद्दपार केली आहे. जिल्ह्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर जिल्हा पोलीस प्रमुखांनी सलग दुसरी हद्दपारीची मोठी कारवाई केल्याने कसायांचे धाबे दणाणले आहे.



टोळीप्रमुख वसीम कादीर कुरेशी, वय २८ वर्ष रा. हमालवाडा, आंबेडकर चौक, झेंडीगेट, ता. जि. अहिल्यानगर हल्ली. रा. नागापुर, ता. जि. अहिल्यानगर, टोळी सदस्य अदिल अमीन कुरेशी, वय २० वर्ष रा. सदर बाजार, भिंगार, ता. जि. अहिल्यानगर, हल्ली रा. नागापुर, (पान ३ वर)

# आषाढी वारीसाठी जिल्ह्याला २ कोटी ६१ लाखांचा निधी मंजूर : ना.विखे पाटील

**नायक वृत्तसेवा, शिर्डी**

आषाढी वारीसाठी जिल्ह्यातून मार्गस्थ होणाऱ्या पालख्यांसोबत असलेल्या वारकऱ्यांच्या विविध सुविधांसाठी राज्य सरकारने जिल्ह्यासाठी २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध होणार असून, यातून वॉटरप्रूफ मंडप, शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा व ग्रामपंचायत सहाय्य अनुदान यांचा समावेश असेल.



जिल्ह्यातून दरवर्षी पैठण येथील संत एकनाथ महाराज, त्र्यंबकेश्वर येथील संत निवृतीनाथ महाराज, पिंपळनेर येथील संत निळोबाराय महाराज यांच्या प्रमुख पालख्यांसह सुमारे १६० स्थानिक पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. या वारीत महिला व पुरुष वारकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असते. त्यांच्या प्रवासादरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मागील दोन वर्षांपासून पालकमंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने जिल्हा प्रशासनाकडून नियोजन केले जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पालखी नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस वरिष्ठ अधिकारी, प्रमुख देवस्थानांचे प्रतिनिधी, दिंड्यांचे प्रमुख उपस्थित होते. पालखी मार्गावरील अडचणी जाणून घेत प्रशासनाने सर्व सुविधा वेळेत पुरवण्याचे (पान ३ वर)

# आज पासून पावसाचा वेग आणि व्याप्ती वाढणार : डख

## संगमनेर सह पश्चिम महाराष्ट्रात कोसळणार

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

राज्यातील वातावरणामध्ये लक्षणीय बदल होत असून येत्या काही दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रभर पावसाचा जोर वाढणार आहे. गेल्या काही आठवड्यांपासून अनेक भागात पावसाने उशिरा हजेरी लावली होती, काही ठिकाणी केवळ हलक्याशा सरी कोसळल्या तर काही भाग अजूनही कोरडाच राहिला आहे. पण आता हवामान अभ्यासक पंजाब डख यांच्या अंदाजानुसार, संपूर्ण राज्यात पावसाचा वेग आणि व्याप्ती वाढणार आहे. त्यामुळे संगमनेर सह पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये आज शुक्रवार दि.१३ जून पासून बुधवार दि.१८ जून पर्यंत अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



१२ आणि १३ जूनच्या दरम्यान पूर्व आणि पश्चिम विदर्भात पावसाचे आगमन होईल. यामध्ये अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण चांगले असेल. हे पावसाचे प्रमाण दररोज भाग बदलत वाढणार असून, प्रत्येक जिल्ह्याला काही प्रमाणात नित्यनेमाने पावसाचा लाभ होईल. विशेष म्हणजे (पान ३ वर)












तुम्ही सामाजिक, राजकीय स्वातंत्र मिळवू शकाल, पण आपल्या इच्छांची गुलामी तोडू शकणार नाही, तोवर खऱ्या मुक्तीचा आनंद लाभणार नाही. –स्वामी विवेकानंद

# समर्थकांची ससेहोलपट

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाच्या वतीने आज मूळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्त पुण्यात मेळावे झाले. अजित पवार यांच्या पक्षाचा मेळावा बालेवाडी स्टेडियमवर झाला, तर शरद पवार यांच्या पक्षाचा मेळावा बालगंधर्व रंग मंदिरात झाला. या दोन्ही पक्षांचे नाव आणि चिन्ह वेगवेगळी असली तरी दोन्ही पक्षांनी आपणच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस आहोत असा दावा कायम ठेवल्याने २६ वर्षांपूर्वी ज्या दिवशी काँग्रेसमधून बाहेर पडून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती नेमका तोच दिवस दोन्ही पक्षाने आज आपला वर्धापन दिन म्हणून साजरा केला. दोन्हीकडे जोरदार भाषणबाजी झाली, परंतु त्यांनी एकमेकांवर थेट टीका करण्याचे टाळले. आज ना उद्या हे दोन्ही पक्ष एकत्र येणार अशी चर्चा अजूनही कायम आहे. मध्यंतरी शरद पवार यांनी त्याविषयीचे सुतोवाच केले होते आणि नंतरही त्याला दोन्ही पक्षाच्या समर्थकांनी आपापल्या परीने दुजोरा देत या एकत्रीकरणाच्या बाजूने आपला कौल दिला आहे. या एकत्रीकरणाचा प्रस्ताव अजित पवार गटाकडून मान्य होताना दिसत नाही. असे एकत्रीकरण शक्य नसल्याचेही संकेत अजित पवार गटाने याआधी दिले आहेत. आजही सुनील तटकरे यांनी याविषयी माध्यमांशी बोलताना, आमच्याकडे तसा कोणताही प्रस्ताव आलेला नाही, असे उत्तर देऊन या एकत्रीकरणाच्या वावड्या थांबवण्याचा प्रयत्न केलेला दिसला. दुसरीकडे शरद पवार गटाकडून मात्र असे एकत्रीकरण होणारच नाही असे ठामपणे स्पष्ट केले गेलेले नाही. सुप्रिया सुळे यांना याविषयी पत्रकार नेहमी प्रश्न विचारत असतात. पण त्याही काही थांगपत्ता लागू देत नाहीत. 'मी बाहेर होते, मी दौर्यावर होते, माझ्यापर्यंत अजून काहीच आलेले नाही, पवार साहेबांबरोबर माझी अजून बोलणे झालेले नाही', अशी उत्तरे याबाबतीत त्यांच्याकडून दिली जातात. पण एकत्रीकरण व्हावे की नाही याविषयी त्या स्वतःचे मत अजिबात व्यक्त करत नाहीत. त्यांचा सारा रागरंग मात्र या एकत्रीकरणाला विरोध असल्याचा दिसत नाही. दोन्ही पक्षाचे प्रमुख नेते अजित पवार आणि शरद पवार या दोघांनीही आज या एकत्रीकरणावर कोणतेही भाष्य करणे टाळले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटातील नेतेच अजित पवारांबरोबर जुळून घेण्याच्या अगतिकतेत दिसत आहेत. शरद पवार पक्षाला स्वतंत्र अस्तित्व राखणे आता दिवसेंदिवस जिकेरीचे होत चालल्याचे त्यातून जाणवते आहे. कारण या पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांनाही कायम सत्तेचीच सवय राहिली आहे. सत्तेबाहेर राहून कडवा संघर्ष करणे हा मार्ग त्यांना आता असह्य होताना दिसतो आहे. म्हणूनच शरद पवार पक्षाचे आमदारही, चला आपण अजितदादांबरोबरच जाऊ असा आग्रह धरताना दिसतात. या मूळ पक्षाचे संस्थापक शरद पवार मात्र राजकीय निर्णय प्रक्रियेतून आपण सध्या दूर झालो आहोत असा सूर आळवताना दिसतात. सर्व निर्णय सुप्रिया पवार आणि पक्षाचे बाकीचे अन्य नेते घेतील असे ते सूचित करत असतात. पण काहीही झाले तरी आपल्या पक्षाचे अस्तित्व कायमच राहील आणि आम्ही भाजपबरोबर कदापिही जाणार नाही असे त्यांच्यापैकी कोणीही ठामपणे सांगत नाही. आज अजित पवारांचा जो पक्ष भाजपबरोबर गेला आहे, तो मोठ्या साहेबांच्या संमतीतूनच गेला आहे असे मानणारे अनेक जण आजही या दोन्ही पक्षात आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही पक्षांविषयी जी संभ्रमाची अवस्था निर्माण झाली आहे ती शक्य तितक्या लवकर दूर झाली तर कार्यकर्त्यांच्या मनातील अस्वस्थताही संपेल. आज शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांना, उद्या पक्षाचे नेते नेमका काय निर्णय घेतील याची ठाम कल्पना नसल्याने जाहीर प्रचार सभांमध्ये आपण महायुती सरकारच्या विरोधात भूमिका घ्यायची की अजून अधांतरीच चाचपडत राहायचे या संभ्रमाच्या अवस्थेत ते आहेत. सतत सत्तेच्या सावलीत वावरत राहिलेल्या लोकांना विरोधी पक्षात राहून कडवा संघर्ष करणे किती जड जात असते ते या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाकडे पाहून लक्षात येते. या देशात कितीतरी असे राजकीय पक्ष आहेत की ज्यांना कधीच सत्तेची सावली मिळालेली नाही, पण तरीही त्यांनी आपली विचारधारा आणि संघर्ष सोडलेला नाही. सतत सत्तेसाठी तडजोडी करणे आणि हे करत असताना आपण जनतेच्या हितासाठीच हे करीत आहोत असे भासवणे ही एक प्रकारची बनवेगिरीच असते. मात्र सत्तेची सावली प्राप्त करण्याची किमया राष्ट्रवादीने कायमच केली आहे हे राज्यातील जनतेने वेळोवेळी पाहिले आहे. अजित पवार यांनीही भाजपबरोबर जाण्यासाठी जी तडजोड केली ती अनेकांना आजही पटलेली नाही. मुळात त्यांचा पहाटेचा तो शपथविधी अजूनही अनेकांच्या लक्षात आहे. महाविकास आघाडी सोडून रातोरात भाजपबरोबर गेलेल्या अजित पवार यांना पुन्हा पक्षात घेऊन उपमुख्यमंत्री पद दिले गेल्याने मूळ राष्ट्रवादी काँग्रेसचे नुकसानच झाले आहे, त्यामुळे आता पुन्हा त्यांच्याबरोबरच एकत्र जाणे हे आपल्यासाठी सन्मानाचे असणार नाही अशी खूणगाठ शरद पवार यांच्या समर्थकांनी मनाशी बांधायला हवी.

# बिनबुडाच्या विधानांमागचे राजकारण

**पॉलिटिकल**

**ज्येष्ठ अभिनेते आणि दक्षिणेतील सुपरस्टार कमल हसन यांनी कन्नड भाषेचा जन्म हा तमिळ भाषेतूनच झाल्याचे विधान करून खळबळ उडवून दिली होती. याबाबत कर्नाटक उच्च न्यायालयाने 'तुम्ही कमल हासन असाल, एक प्रसिद्ध व्यक्तिमत्व, पण त्यामुळे तुम्हाला इतरांच्या भावना दुखावण्याचा अधिकार मिळत नाही,' अशा शब्दांत फटकारले आहे. हसन यांनी यापूर्वी हिंदी भाषिक लोकांच्या भावना दुखावणारे वक्तव्येही केली होती. अशा प्रकारची वक्तव्ये करून काय फायदा होतो, हे ते स्वतःच सांगू शकतात. पण या वक्तव्यांमुळे आपली गणना देशातील सुमार व बेताल वक्तव्ये करणाऱ्या नेत्यांमध्ये केली जात आहे, हे निश्चित.**

■ के. श्रीनिवासन





कमल हसन हे भारतीय चित्रपटसृष्टीतील कसदार अभिनयासाठी प्रसिद्ध असणारे कलाकार म्हणून ओळखले जातात. अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती, अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रभावी कामगिरी करणाऱ्या कमल हासन यांनी काही वर्षांपूर्वी राजकारणाच्या क्षेत्रातही प्रवेश केला. दक्षिणेतील सुपरस्टार असल्याने त्यांनी तीच आपली राजकीय कर्मभूमी म्हणून निश्चित केली. राजकारणात प्रवेश करताना स्वत: द्रविडी राजकारणापासून दूर राहणार असल्याची हमी हसन यांनी दिली होती. पण तमिळ अस्मितेबाबत कट्टर असलेल्या पक्षाशी त्यांनी जवळीक साधली. पुढे तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना खूश करत राज्यसभेची जागा घेतली. राजकारणाच्या क्षेत्रात जराही जम बसवता न आलेल्या हसन यांनी अकारण वादग्रस्त वक्तव्ये करुन वाद निर्माण करण्याचा प्रयत्न मात्र निश्चितपणे केला. पण ही बाब त्यांच्या देशभरातील चाहत्यांच्या पचनी पडली नाही.

अलीकडेच चेन्नईत नव्या चित्रपटाच्या प्रमोशनच्या वेळी दिलेल्या एका मुलाखतीत दक्षिण भारतातील भाषांबाबत बोलताना त्यांनी कन्नड भाषेचा संदर्भ घेतला आणि कन्नड भाषेचा जन्म हा तमिळ भाषेतूनच झाल्याचे विधान केले. विशेष म्हणजे कमल हसन यांनी हे वक्तव्य प्रसिद्ध कन्नड अभिनेते शिवा राजकुमार यांच्या उपस्थितीत केले. शिवा राजकुमार हे कन्नड अभिनेते दिवंगत डॉ. राजकुमार यांचे चिरंजीव असून त्यांनी १९८० च्या दशकात गोकाक भाषिक आंदोलनाचे नेतृत्व केले होते. गोगाक आंदोलनाला कर्नाटकच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. कन्नड भाषेला पहिली भाषा म्हणून दर्जा द्यावा या मागणीसाठी आंदोलन पुकारण्यात आले होते. हा इतिहास माहीत असूनही हसन यांनी हे विधान केले.

साहजिकच, त्यांच्या या विधानामुळे कन्नड प्रेमींमध्ये संताप उसळला. सोशल मीडियावर त्यांच्यावर टीकेची झोड उठली. प्रादेशिक अस्मिता आणि भाषिक स्वाभिमान यावर घाव बसल्याचे अनेकांनी म्हटले. काही संघटनांनी तर 'ठग लाइफ' चित्रपट कर्नाटकमध्ये प्रदर्शित होऊ देणार नाही असे खुलेआम जाहीर केले. कर्नाटकचे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी या विधानाचा निषेध केला. सध्या कावेरी पाणी वाटप मुद्यावरून कर्नाटक आणि तमिळनाडू यांच्यातील संबंध ताणलेले असताना कमल हसन यांनी अशा प्रकारचे वाद निर्माण करणारे वक्तव्य टाळायला हवे होते. शिवाय दोन्ही राज्ये भाषेच्या अस्मितेवरून सजग आणि संवेदनशील आहेत. अशा वेळी एखादे वादग्रस्त विधानही आगीत तेल ओतणारे ठरू शकते, हे हसन यांच्यासारख्या अभ्यासू व्यक्तीला माहीत असणे आवश्यकच होते. तरीही त्यांनी जोखीम उचलली. बेळगाव, म्हैसूर, हुबळी, बंगळूरसह अनेक ठिकाणी कमल हसन यांच्या विरोधात निदर्शने झाली. दुसरीकडे तमिळनाडूतील द्रमुक, पीएमके, व्हीसीके, एनटीके सारख्या मुख्य प्रवाहातील पक्षांनी या वक्तव्याला ऐतिहासिक संदर्भ असल्याचे सांगत कमल हसन यांच्या वक्तव्याची पाठराखण केली. काही पक्षांनी याहीपुढे जावून तमिळ ही सर्व द्रविड भाषांची जननी आहे, असे सांगत आणखीच गोंधळ निर्माण केला. या सर्व प्रकारामुळे दक्षिणेकडील राज्यांतील तणाव आणखीच वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर कमल हसन यांच्या वक्तव्याला खरोखरच आधार आहे का? हा पहिला प्रश्न. यासाठी इतिहासाचा संदर्भ शोधता असे दिसून येते की, मागील काळात अनेक दशके अभ्यास झाल्यानंतर अभ्यासकांनी पाच द्रविड भाषा निश्चित केल्या होत्या. त्यात तमिळ, तुलू, मल्याळम, कन्नड यांचा समावेश आहे. त्यांना पंच द्रविड असेही म्हटले जाते. भाषा तज्ज्ञांमध्ये काही मुद्यावर एकमत असून यात सुमारे चार हजार वर्षांपूर्वी एकच द्रविड भाषा होती आणि त्यास प्रोटो द्रविड असे म्हटले जात असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे. अर्थात या प्रोटो द्रविड भोषेने काळानुसार महत्त्व गमावले आणि ती लुप्त झाली. यामागचे कारण म्हणजे ही भाषा बोलणारे नागरिक वेगवेगळ्या भागातून स्थलांतरित झाले आणि तेथे त्यांनी स्वत:ची ओळख, भाषा प्रस्थापित केली. या प्रक्रियेत कन्नड आणि तमिळसारख्या द्रविड कुटुंबातील महत्त्वाच्या भाषा या प्रोटो द्रविडच्या तुलनेत वेगळ्या रुपात विकसित झाल्या. विशेष म्हणजे कन्नड भाषा ही अडीच हजार वर्ष जुनी असताना तमिळ तर त्यापेक्षा जुनी मानली जाते. मात्र याचा अर्थ असा नाही की कन्नडची उत्पत्ती ही तमिळ भाषेतून झाली आहे.

इतिहासातील गोष्टींबाबत मतमतांतरे ही वर्षानुवर्षे राहिली आहेत; पण अलीकडील काळात हे विषय संवेदनशील बनले आहेत, याची जाणीव हसन यांना असणे अपेक्षित होते. या प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयानेही कमल हासन यांची कानउघाडणी केली आहे. तुम्ही कमल हासन असाल, पण त्यामुळे तुम्हाला कोणीही व्यक्ती किंवा समुदायाच्या भावना दुखावण्याचा अधिकार मिळत नाही, अशी स्पष्ट टिप्पणी न्यायालयाने केली आहे. ही टिप्पणी महत्त्वाची होती. कारण ती 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'सामाजिक जबाबदारी' यामधील सीमारेषा स्पष्ट करते. कोणतीही व्यक्ती, विशेषतः स्टारडम किंवा जनसामान्यांत लोकप्रिय असणाऱ्या व्यक्तंनी आपल्या वक्तव्याने जनतेच्या भावना दुखावणार नाहीत याची खबरदारी घेणे अपेक्षित असते. कमल हासन यांनी या प्रकारानंतर 'ठग लाइफ' चित्रपटाचे कर्नाटकमधील प्रदर्शन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. वस्तुतः, त्यांनी कोणताही औपचारिक माफीनामा दिलेला नसला, तरी हा निर्णय एक प्रकारची सामाजिक समेटाची भूमिका म्हणता येईल.

वादग्रस्त वक्तव्य करण्याची कमल हसन यांची पहिलीच वेळ नाही. यापूर्वी देखील त्यांनी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्या हिंदी विरोधी भूमिकेचे समर्थन केले आणि हिंदी भाषिक लोकांच्या भावना दुखावणारे वक्तव्यही केले होते.

कमल हसन यांनी २०१८ मध्ये पक्ष मक्कल निधी मय्यमची स्थापना केली आणि यानुसार त्यांनी दोन निवडणुकाही लढल्या. पण अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र २०२१ मध्ये तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत कमल हसन यांच्या पक्षाने प्रमुख मतदारसंघातील मते घेण्याची क्षमता असल्याचे दाखवून दिले. इथेच द्रमुकने कमल हसन यांच्याशी संधान साधण्यास सुरुवात केली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दोन्ही पक्षात आघाडी झाली. आता कमल हसन यांचा पक्ष हा द्रमुक आघाडीत असल्याने कमल हसन हे पुढील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत आघाडीचे स्टार प्रचारक राहू शकतात.कमल हसन यांना तमिळ जनतेतील तमिळ भाषेविषयी असणारी आत्मियता आणि भाविनिक श्रद्धा चांगलीच ठाऊक आहे. या कारणामुळेच त्यांनी चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने आयोजित सभेत भाषणाची सुरुवात 'उईरे उरावे तमीज' ने (माझे आयुष्य माझे कुटुंब तमिळ आहे) केली. इथपर्यंत ठिक. परंतु यानंतर त्यांनी भाषेचा इतिहास न पाहता तसेच कन्नड लोकांच्या भावनांचा विचार न करता केवळ तमिळ लोकांना खूश करण्यासाठी कन्नड अभिनेत्यासमोर तमिळ भाषेचे गुणगाण गायले आणि कन्नड भाषेला कमी लेखले.

कमल हासन हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मोठे समर्थक मानले जातात. त्यांनी अनेकदा राजकीय, सामाजिक विषयांवर परखड मतं व्यक्त केली आहेत. पण कोणत्याही लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य निर्बंधहीन नसते. ते एक सामाजिक आणि कायदेशीर चौकटीत असते. कोणतीही व्यक्ती, विशेषतः सार्वजनिक व्यक्तिमत्त्व, जेव्हा आपलं मत मांडते, तेव्हा त्याचा सामाजिक परिणाम काय होईल याचीही जाणीव असणे आवश्यक आहे. प्रसिद्ध व्यक्तींच्या वक्तव्याला विशेष वजन असते आणि ते समाजाच्या भावना ढवळून काढू शकते. भारत हे भाषिक विविधतेने समृद्ध असलेली राष्ट्र आहे. प्रत्येक राज्याची आपली भाषा, साहित्य, परंपरा आणि सांस्कृतिक अस्मिता आहे. अशा देशात राजकीय पोळी भाजण्यासाठी भाषेबाबतची कोणतीही टिप्पणी किंवा तुलनात्मक वक्तव्य एखाद्या वणव्यासारखे भडकू शकते. कलाकार, लेखक, दिग्दर्शक यांच्या कृती आणि वक्तव्यांकडे लोक बारकाईने पाहात असतात. या स्टारडमचा वापर केवळ चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी करायचा नसतो, तर त्यासोबत येणाऱ्या जबाबदारीचे भानही ठेवणे गरजेचे असते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे, पण तो समाजातील इतर घटकांच्या भावनांचा आदर करत वापरणे आवश्यक आहे. कमल हसन जेव्हा राजकारणात आले, तेव्हा त्यांच्याकडे जबाबदार व्यक्तिमत्व म्हणूनच पाहिले गेले. पण अशा प्रकारची वादग्रस्त वक्तव्ये करुन त्यांना काय मिळते, हे तेच जाणोत ! पण या वक्तव्यांमुळे आपली गणना देशातील सुमार व बेताल वक्तव्ये करणाऱ्या नेत्यांमध्ये केली जात आहे, हे निश्चित.

# ओढवून घेतलेले संकट

**हॉट टॉपिक**

**शहरात हजारो अनधिकृत बांधकामे वर्षानुवर्षे उभी आहेत. त्यांच्यावर कोणी कारवाई करीत नाही. मग आपणही धाडस करून अशा पद्धतीने घर बांधायला काय हरकत आहे?.. असा विचार करून अनेक जण आर्थिक दु:साहस करतात. हा निर्णय किती आत्मघाती ठरू शकतो, याचे उदाहरण पुणे जिल्ह्यातील चिखली भागात पाहायला मिळत आहे. पिंपरी–चिंचवड महापालकेने तेथील ३६ अनधिकृत बंगले जमीनदोस्त केले आहेत. त्यामुळे संबंधितावर थेट रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे.**

**ग्रा हकांची फसगत**

ग्राहकांची फसगत

एका बांधकाम व्यावसायिकाने इंद्रायणी नदीपात्राच्या पूररेषेतील प्रतिबंधक क्षेत्रात भूखंड (प्लॉट) पाडून त्यांची विक्री केली. त्या ठिकाणी बांधकाम करायला परवानगी नाही, हे त्या बिल्डरला आणि त्याच्याकडून खरेदी करणाऱ्या नागरिकांनाही माहीत होते. पण, तुम्ही बेलाशक घर बांधा. या महापालिका हद्दीत अशी असंख्य घरे आहेत. तुम्हालाही कोणी अडवणार नाही. तुमचे घर एकदम स्वस्तात होऊन जाईल, अशा आशयाची साखरपेरणी बिल्डरने केली होती. त्याला हे ग्राहक फशी पडले.

**स्वस्त जागेची भुरळ**

त्या परिसरात नियमानुसार बांधकामयोग्य मोकळ्या जागांचे जे भाव आहेत, त्यापेक्षा कमी पैशांत नदीलगतची जागा मिळत होती. तेथील बांधकाम भले बेकायदा ठरणार असले, तरी वजनदार स्थानिक पुढाऱ्यांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे त्यांना संरक्षणाची तोंड भरून हमी दिली होती. त्यामुळे एकामागोमाग एक बांधकामे होत गेली आणि ही बंगल्यांची वसाहत आकाराला आली. यात बंगलेधारकांनी खूप मोठी जोखीम पत्करली होती. पण तिची तीव्रता सुरूवातीला त्यांच्या लक्षात आली नाही. त्याची शिक्षा त्यांना आता भोगावी लागत आहे.

**बुडत्याचा पाय खोलात**

ही जमीन घेण्यापासून घरबांधणीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर संबंधितांची कृती नवीन अडचणींना, प्रश्नांना आमंत्रण देत गेली. या प्रवासात बुडत्याचा पाय खोलात, अशी त्यांची अवस्था झाली. जे घर त्यांच्या नावावर अधिकृतरीत्या कधीच होणार नव्हते, ते उभारण्यासाठी त्यांनी पैसे कसे जमविले असावेत?.. एका कुटुंबातील वडिलांनी गावाकडील तीन एकर शेती विकून ते पैसे बांधकामासाठी मुलाच्या हवाली केले.. कोणी घरचे सोनेनाणे विकून, उसनवारी करून, खासगी वित्तसंस्था, पतपेढ्या, सावकाराकडून पैशांची तजवीज केली.

या संस्थांचे गृहकर्जाचे व्याजदर राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा चढे असतात. पण नियमबाह्य बांधकामांना बड्या बँकांचे कर्ज मिळणे शक्य नसल्याने संबंधितांपुढे अन्य पर्याय नव्हता. एरवी गृहकर्जाच्या परतफेडीवर प्राप्तिकरात सवलत मिळते. मात्र पतपेढ्यांनी दिलेल्या वा सावकारी कर्जाला ही तरतूद लागू होत नाही. म्हणजे येथेही नुकसान.

**कारवाई रोखण्यासाठी लाच**

या घरांचे बांधकाम सुरू असताना, महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक तेथे धडकू नये, यासाठी संबंधितांना लाच द्यावी लागत होती. आम्ही बंगल्याच्या प्रत्येक स्लॅबमागे एक लाख रुपये मोजले आहेत, अशी तक्रार काही जणांनी समाज माध्यमांवर केली आहे. त्याबाबत एका कर्मचाऱ्याचे नावही त्यांनी उघडपणे घेतले आहे. सर्व ३६ बंगलेधारकांनी ही तडजोड केली असेल, तर त्यांच्याकडून लाटली गेलेली रक्कम कोटींच्या घरात जाईल. एकदा गैरमार्गावर प्रवास सुरू केला, की त्यावरील खाचखळगे, हादरे, दणके सहन करण्याखेरीज गत्यंतर नसते, हेच खरे!

**स्थानिक पुढारी गायब**

या बंगल्यांच्या नदीपात्रातील अतिक्रमणांविषयी प्रथम राष्ट्रीय हरित लवादाकडे तक्रारी गेल्या. त्यांनी ही बांधकामे हटविण्याचा आदेश दिला आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले. त्यामुळे बंगले वाचविण्याच्या सर्व प्रयत्नांना खो बसला. महापालिकेने त्या ठिकाणी पाडकामासाठी बुलडोझर आणले, तेव्हा जागामालकांचे कैवारी म्हणविणारे पुढारी तिकडे फिरकलेही नाहीत. ते फोनवरही उपलब्ध होत नव्हते. त्यांच्यावर टाकलेला विश्वास किती अनाठायी होता, याचा साक्षात्कार लोकांना तेव्हा झाला!

**घर गेले, कर्ज राहिले**

बहुतांश बंगलेधारक मध्यमवर्गीय वा त्यावरील आर्थिक स्तरातील आहेत. त्यांनी घरावर केलेला लाखो किंवा कोटी रुपयांचा खर्च शब्दशः धुळीस मिळाला आहे. वास्तू भुईसपाट झाली असली, तरी त्यासाठी घेतलेले कर्ज त्यांच्या डोक्यावर तसेच आहे. त्याचा हप्ता (ईएमआय), आता पर्यायी घरासाठी भरावे लागणारे भाडे, नेहमीचा घरखर्च यांची मासिक कमाईबरोबर तोंडमिळवणी करताना त्यांची दमछाक होणे साहजिक आहे. त्यात त्यांच्या वैयक्तिक पतगुणांकावर (सिबिल स्कोअरवर) विपरीत परिणाम होऊ शकतो.

घर म्हणजे केवळ आर्थिक गुंतवणूक नसते, तर त्याला भावनात्मक किनारही असते. स्वमालकीचे घर, हा गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. त्यामुळे आयुष्यभराची पुंजी पणाला लावून उभारलेला हक्काचा निवारा अचानक डोळ्यांसमोरून नाहीसा होतो, तेव्हा तो मानसिक धक्का सहन करणे सोपे नसते. घरातील सर्व आबालवृद्धांना या संकटाला सामोरे जावे लागते.

**कायदेविषयक अज्ञान**

आर्थिक, कायदेविषयक गोष्टींचे अज्ञान, हे अशा प्रकारांमागील एक मुख्य कारण आहे. महापालिका आमच्याकडून कर घेते, म्हणजे आमचे घर अधिकृत झाले, असा अनेकांचा गैरसमज आहे. केवळ या कराची पावती हा मालकी हक्काचा पुरावा कधीच नसतो. पाणी, रस्ते, ड्रेनेज, पथदिवे यांसह महापालिका ज्या विविध सेवा पुरविते, त्यांचे हे शुल्क असते. पण अनेक उच्चशिक्षितांनाही त्याची कल्पना नाही. त्याचे पर्यवसान मग अशा घोडचुकांमध्ये होते.

**अनुत्तरीत प्रश्न**

बेकायदा बांधकामांना काही सरकारी धोरणेही कारणीभूत ठरत आहेत. मुळात जे क्षेत्र प्रतिबंधित आहे, तेथील जागांचे खरेदी–विक्रीचे व्यवहार का नोंदवले जातात? त्यांना मनाई केल्यास कोणाची फसवणूक होण्याची शक्यताच राहणार नाही. दुसरे म्हणजे अनधिकृत बांधकाम पूर्ण झाल्यावर ते पाडण्यासाठी पुढे सरसावणारी महापालिका, बांधकामाच्या पहिल्या टप्प्यातच कारवाईसाठी पुढे का येत नाही? (उलट महापालिका त्या भागात सर्व मुलभूत सुविधा पुरविते!).. या त्रुटी हेतूपुरस्सर ठेवल्या जातात का?.. त्यामागे बिल्डर, स्थानिक पुढारी आणि महापालिका यांचे संगनमत असते का?.. असे अनेक प्रश्न आहेत.

**सार्वत्रिक सहानुभूती**

या घटनेत ज्यांचे नुकसान झाले, त्यांच्याबद्दल सार्वत्रिक सहानुभूती आहे. पण कायदाकानूकडे दुर्लक्ष करून त्यांनी स्वतः हे संकट ओढवून घेतले, हीदेखील वस्तुस्थिती आहे. त्या घरांना महापालिकेची परवानगी नसल्याने ती पाडली जाऊ शकतात, याची कल्पना त्यांना सुरूवातीपासून होती. तरीही त्यांनी जोखीम घेतली आणि ती त्यांच्या अंगलट आली. या प्रकारापासून बोध घेऊन इतर संभाव्य खरेदीदारांनी अशा चुका होणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी जाणकार वकिलाची मदत घ्यायला हवी. अन्यथा, आज जे पिंपरी चिंचवड भागात घडले, उद्या ते राज्याच्या कोणत्याही भागात घडू शकते. याबाबतीत सगळ्यांच्याच चुकीला क्षमा मिळते असे नाही!..

**– रमेश डोईफोडे,**
**ज्येष्ठ पत्रकार**

## पान १ वरुन

**चार वर्षानंतर नगरपालिका निवडणुकांचा ‘शंखनाद’!**

सोमवारपर्यंत (ता.१६) मुख्याधिकारी प्रगणक गटांची मांडणी करतील. प्रारुप प्रभागरचनेच्या अनुषंगाने १७ व १८ जूनरोजी जनगणनेची प्राप्त माहिती तपासणे, १९ ते २३ जूनपर्यंत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणे, २४ ते २६ जून दरम्यान गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे, २७ ते ३० जूनपर्यंत नकाशावर दर्शवल्याप्रमाणे प्रभागाच्या हद्दि जागेवर जावून तपासणे, ४ ते ८ जुलै या दरम्यान प्रारुप प्रभागरचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाला पाठवणे. १५ ते २१ जुलै या कालावधीत प्रारुप प्रभागरचना प्रसिद्ध करुन त्यावर हरकती मागवणे, २२ ते ३१ जुलै पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांनी त्यावर सुनावणी घेणे, १ ते ७ ऑगस्ट दरम्यान सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेवून अंतिम केलेली प्रारुप प्रभागरचना निवडणूक आयोगाला सादर करणे. २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली अंतिम प्रभागरचना अधिसूचनेद्वारा प्रसिद्ध करणे या प्रकारे हा दोन महिन्यांचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

यावेळच्या नगरपालिका निवडणुकीत राज्य शासनाने २५ जानेवारी २०२२ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार बहुसदस्यीय नव्हेतर द्विसदस्यीय रचनेनुसारच प्रभागांची निर्मिती होणार आहे. याच तारखेच्या अन्य एका अध्यादेशानुसार ‘ब’ वर्ग नगरपालिकांची किमान सदस्यसंख्या २५ असेल आणि ४० हजारपेक्षा अधिक लोकसंख्येवरील प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक सदस्याची वाढ होईल. त्यानुसार संगमनेर नगरपालिका हद्दिची २०११ सालनुसार लोकसंख्या ६५ हजारांपेक्षा अधिक असल्याने पालिकेच्या नगरसेवकांमध्ये ४० हजारांवरील प्रत्येक पाच हजारांमागे एक याप्रमाणे पाच सदस्य वाढून सभागृहात निवडून जाणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या ३० होणार आहे. त्यासाठी संगमनेर विधानसभा मतदारसंघ फोडून त्यातून १५ प्रभाग निर्माण केले जाणार असून प्रभागातील सदस्यसंख्या कायम असली तरीही नगराध्यक्षांची निवड मात्र थेट जनतेतूनच होणार आहे.

**आषाढी वारीसाठी जिल्ह्याला २ कोटी ६१ लाखांचा निधी मंजूर : ना.विखे पाटील**

आश्वासन दिले. यासाठी विविध विभागांचे अधिकारी समन्वयक म्हणून काम करणार आहेत. अहील्यानगर जिल्ह्याने सुरू केलेला हा पॅटर्न संपूर्ण राज्यात आदर्श मानला जात असून, सोलापूर जिल्ह्यातही याच धर्तीवर नियोजन सुरू झाले आहे.

पावसाळ्यातील मुक्कामांदरम्यान वॉटरप्रूफ मंडपांची गरज, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छतागृहे, वैद्यकीय सुविधा व पिण्याच्या पाण्याच्या अडचणी वारकऱ्यांनी अधोरेखित केल्या. यावर तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्री विखे पाटील यांनी संबंधित प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर त्यांनी पाठपुरावा करून ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. या निधीतून सर्व पालखी मार्गांवर सुविधा पुरवण्यासाठी तातडीने कार्यवाहीचे आदेशही पालकमंत्र्यांनी प्रशासनास दिले आहेत.

**कसायांची टोळी एक वर्षांसाठी हद्दपार!**

ता.जि. अहिल्यानगर व शफिक नुर कुरेशी, वय ५० वर्ष रा. सदर बाजार, भिंगार, ता. जि. अहिल्यानगर, हल्ली रा. नागापुर, ता. जि. अहिल्यानगर यांनी एक गुन्हेगारी टोळी तयार करुन त्यांच्या टोळीचे गुन्हेगारी अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांनी शहरातील सर्वसामान्य नागरीकांमध्ये दहशत निरंतर राहण्याकरीता गोवंशीय जनावरांची कत्तल करून जनावरांचे मांस विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगणे व त्याची वाहतुक करणे असे गुन्हे सराईतपणे केले असुन दिवसेंदिवस टोळीची गुंडगिरी व गुन्हेगारी वृत्ती वाढतच चालली होती. टोळीतील टोळी प्रमुख व सदस्यांनी २०२३ ते २०२५ मध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल सराईतपणे केली असुन टोळीच्या गैर कृत्यास प्रतिबंध होण्यासाठी त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई व प्रतिबंधक कारवाई करुनही त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. टोळीच्या सदर कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.त्यामुळे टोळीने केलेल्या गुन्ह्यांबाबत कोणीही सर्वसामान्य नागरीक उघडपणे तक्रार, साक्ष अगर माहिती देण्यास पोलीस स्टेशनला येत नव्हते. सदर टोळीकडून भविष्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे घडणार असल्याने संपुर्ण टोळीची पांगापांग करुन हद्दपार केल्याशिवाय टोळीच्या गैरकृत्यांना आळा बसणार नव्हता तसेच अहिल्यानगर शहर व आजुबाजुच्या परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या जिवीताच्या सुरक्षिततेसाठी व टोळीची दहशत कमी करण्यासाठी व त्यांच्या गैरकृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी टोळीप्रमुख व टोळी सदस्य यांचे विरुध्द सहाय्यक पोलीस निरीक्षक, एम. आय. डी. सी. पोलीस स्टेशन यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ नुसार अहिल्यानगर जिल्हा हद्दीतुन दोन वर्षाकरीता हद्दपार करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक तथा हद्दपार प्राधिकरण यांचेकडे सादर केला होता. सदर प्रस्तावाची उपविभागीय पोलीस अधिकारी, अहिल्यानगर ग्रामीण विभाग, अहिल्यानगर यांनी चौकशी करुन शिफारस अहवाल सादर केला होता. सदर प्रस्तावाची सोमनाथ घार्गे, हद्दपार प्राधिकरण अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी सखोल चौकशी करुन टोळीप्रमुख वसीम कादीर कुरेशी, टोळी सदस्य अदिल अमीन कुरेशी व शफिक नुर कुरेशी, यांना जिल्हयातुन एक वर्षाकरीता हद्दपार केले बाबतचे आदेश सोमनाथ घार्गे यांनी पारीत केले आहेत.

जिल्ह्यात संघटीतपणे गुन्हे करणाऱ्या टोळीचा बिमोड करण्यासाठी गोवंशीय कायद्यान्वये तसेच भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे करणाऱ्या गुन्हेगार टोळीची माहिती संकलीत करुन त्यांचे विरुध्द हद्दपारीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच आणखी गुन्हेगारांच्या टोळीची माहिती संकलीत करण्याचे काम चालु आहे, त्यांच्या विरुध्द ही हद्दपारीची कार्यवाही करणार असल्याचे संकेत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत.

**निवडणूक आयोगाचे भाजपसाठी काम : माजी मंत्री थोरात**

ठिकाणी लोकसंख्येपेक्षा मतदानाचे रजिस्ट्रेशन कसे जास्त होऊ शकते. शेवटच्या तासामध्ये सहा लाख मतदार कसे वाढले अशा अनेक गोष्टी शंकास्पद आहेत. याचबरोबर अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये एका होस्टेलमध्ये ७ हजार मतदार नोंदणी आणि त्यांना निवडणुकीचे कार्ड सुद्धा देण्यात आले होते. हा काय प्रकार आहे ? भाजप आणि मित्रपक्ष जिंकण्यासाठी काहीही करतात. निवडणूक आयोग स्वायत्त असला पाहिजे. मात्र आता तसे राहिले नाही तो बीजेपी साठी काम करत आहे. निवडणूक निकालानंतर व्हीव्हीपॅटच्या स्लिप मिळायला पाहिजे होत्या. परंतु त्या निवडणूक आयोगाने नाकारल्या. विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे १५७ उमेदवार विजयी होतील हे खात्रीशीर होते. परंतु मतदार वाढवणे हे त्यांचे प्लॅनिंगचे राजकारण होते. अनितीचे राजकारण हे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे. राहुल गांधी यांच्या प्रश्नांना उत्तरे मिळत नाहीत. निवडणूक आयोग ऐवजी दुसरेच लोक उत्तरे देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. सत्तेसाठी काहीही करणाऱ्या भाजपने महाराष्ट्र विधानसभेमध्ये मॅच फिक्सिंग केली असल्याची टीका करतांना देशाची लोकशाही, राज्यघटना टिकली पाहिजे यासाठी आमचा लढा सुरू राहील असेही माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्र काँग्रेस मधील वरिष्ठ नेते आहेत. संगमनेर विधानसभा मतदारसंघातून सलग आठ वेळेस विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले आहेत. संगमनेर मतदार संघातून बाळासाहेब थोरात विजयी होणार ही काळ्या दगडावरची रेघ होती. मात्र येथे अनपेक्षित निकाल आला. संगमनेरचा अनपेक्षित निकाल हा राज्यासाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी धक्कादायक ठरला आहे. असे कसे होऊ शकते? हा मोठा प्रश्न राज्यामध्ये उपस्थित झाला. अत्यंत अभ्यासू, शांत, संयमी आणि लोकशाहीवर श्रद्धा असलेल्या माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबतच्या वक्तव्याबाबत देशांमध्ये गंभीरतेने विचार होत आहे.

**आज पासून पावसाचा वेग आणि व्याप्ती वाढणार : डख**

मराठवाडा भागातही पावसाचा जोर वाढणार आहे. बीड, लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली, परभणी, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांत २० जूनपर्यंत दररोज पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा पाऊस बहुधा मध्यम ते जोरदार स्वरूपाचे असतील. त्यामुळे या भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक बातमी आहे, कारण या पावसावरच खरीप पिकांची पेरणी आणि सुरुवात अवलंबून असते.

हवामान अभ्यासकांच्या अंदाजानुसार, संपूर्ण महाराष्ट्रात १३ ते २० जून दरम्यान दररोज विविध भागांमध्ये पाऊस होणार आहे. यामुळे शेतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होणार असून, खरीप हंगामाची योग्य सुरुवात होण्याची शक्यता आहे. मात्र, कृषी तज्ज्ञ आणि हवामान अभ्यासकांनी शेतकऱ्यांना पेरणीसाठी थोडी वाट बघण्याचा सल्ला दिला आहे.

# भुतांबरे व गावडे कुटुंबाला किराणा किटचे वाटप

**नायक वृत्तसेवा, साकुर**



संगमनेर तालुक्यातील कौठे मलकापूर येथील सुनील पांडुरंग भूतांबरे व किरण पाराजी गावडे यांचे अपघातात दुःखद निधन झाले. ही माहिती कळताच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने मयतांच्या कुटुंबीयांना किराणा किटचे वाटप करून मदतीचा हात देण्यात आला.

भूतांबरे व गावडे कुटुंबांना किराणा किट देण्यात आली. यावेळी आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, सरपंच राहुल गंभीरे, माजी सरपंच लक्ष्मण गीते, नामदेव भूतांबरे, अर्जुन गावडे, गंगुबाई भूतांबरे, गीताबाई भूतांबरे, नवनाथ गंभीरे, रोहिदास नागरे, सोनाली भुतांबरे, पाराजी गावडे, अक्काबाई गावडे, मीराबाई गावडे, उपसरपंच पोपट पचपिंड, संदीप पचपिंड, भाऊसाहेब गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. बाळासाहेब थोरात यांनी तालुका हा कुटुंबाप्रमाणे मानला असून त्यांनी सातत्याने गोरगरीब व सर्वसामान्य लोकांना नेहमी मदत केली आहे. याचबरोबर तालुक्यातील गाव आणि वाडी वस्तीवर विकासाच्या योजना राबवल्या आहेत. बाळासाहेब थोरात यांच्या सूचनेनुसार यशोधन कार्यालयाचे मुख्याधिकारी डॉ. नितीन भांड, कार्यालयीन अधीक्षक रामदास तांबडे यांनी भूतांबरे व गावडे कुटुंबांना किराणा किटचे वाटप केले. या अपघाताच्या दुःखद घटनेची माहिती मिळताच थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांनीही या दोन्ही कुटुंबाची सांत्वन्पर भेट घेतली होती. यावेळी त्यांच्यासमवेत शंकर खेमनर, संचालक विलास शिंदे, उपसरपंच राहुल गंभीरे, लक्ष्मण गीते, उपसरपंच पोपट पचपिंड, संदीप पंचपिंड यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# समाज विकासासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा : संगीता देशमाने

**नायक वृत्तसेवा, धांदरफळ**



महिलांनी चूल आणि मूल त्याच बरोबर मोबाईल मध्ये गुंतून न राहता समाज विकासासाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या तथा स्वदेश महिला मंचच्या अध्यक्षा संगीता बाळासाहेब देशमाने यांनी केले.

दंडकारण्य वृक्षसंवर्धन अभियानांतर्गत माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे, युवक काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा डॉ.जयश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथे निशा कोकणे, प्राजक्ता घुले, संगीता देशमाने व सरपंच उज्वला देशमाने यांच्या प्रमुख उपस्थितीत व सर्व ग्रामपंचायत महिला सदस्य मंडळ तसेच महिलांनी ‘उत्सव नारीशक्तीचा, सोहळा सौभाग्य दिनाचा’ या कार्यक्रमात सहभाग नोंदवत वटवृक्षाची पूजा करून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी संगीता देशमाने बोलत होत्या. त्यापुढे म्हणाल्या की, वृक्ष आणि महिला यांचे अतूट नाते आहे. या माध्यमातून गेल्या अकरा वर्षापासून स्वदेश महिला मंच विविध सामाजिक, धार्मिक उपक्रमातून महिला, युवक, युवती यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत असते. वटपौर्णिमा उत्सव साजरा करतांना ज्या वृक्षाला सात वर्षांपूर्वी घरातल्या कुंडीतून रामेश्वर मंदिर परिसरामध्ये ज्याचे रोपण केले, त्या वृक्षाच्या सावलीत महिला एकत्र खाली बसू शकतात, या पाठीमागची संकल्पना हीच आहे की, महिलांनी चूल आणि मूल, त्याचबरोबर मोबाईल यामध्ये गुंतून न राहता समाज विकासासाठी आपले योगदान द्यावे. जागतिक तापमान वाढीचा धोका लक्षात घेऊन महिलांनी घराच्या गच्चीवर किंवा मोकळ्या जागेत परसबागेत छोटे छोटे वृक्ष लावून आपल्या कुटुंबांना सेंद्रिय भाजीपाला अथवा जे आयुर्वेदिक वृक्ष आहे त्यांचे रोपण करावे. वट वृक्षासारखा वृक्ष हा सर्वाधिक जास्त ऑक्सिजन देणारा वृक्ष आहे, म्हणून वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने रामेश्वर मंदिर परिसरात हा वृक्षारोपणाचा संवर्धन सोहळा म्हणजेच आपण लावलेल्या वृक्षाच्या छायेमध्ये बसून ऑक्सिजन घेणे म्हणजे आनंद सोहळा असल्याचे त्या म्हणाल्या, वृक्षारोपणाशिवाय जीवन अधुरे आहे.

‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे’ या संत तुकारामांच्या अभिवाचनाप्रमाणे वृक्ष खऱ्या अर्थाने आपले चांगले मित्र होऊ शकतात आणि आपल्याला जीवनदान देऊ शकतात, यासाठी वृक्षारोपण केले पाहिजे. यासाठी धांदरफळ ग्रामपंचायत व दंडकारण्य मोहिमेमध्ये सहभाग घेऊन माझी वसुंधरा हा अभिनव उपक्रम ग्रामपंचायतच्या माध्यमातून सरपंच उज्वला देशमाने, महिला सदस्यां, रामेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ, मालपाणी उद्योग समूह यांच्या माध्यमातून हा वृक्षारोपण सोहळा संपन्न होत असल्याचे संगीता बाळासाहेब देशमाने यांनी सांगितले.

नायक ANCHOR

# शिक्षिकेंनी केली अनोख्या पद्धतीने वटपौर्णिमा साजरी

**नायक वृत्तसेवा, अकोले**



प्रशिक्षणामूळे वटपौर्णिमाच्या दिवशी सुट्टी नसल्याने महिला शिक्षिकेंनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अनोखी वटपौणिमा साजरी केली. यावेळी विस्ताराधिकारी सविता कचरे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा प्रशिक्षण संस्था ( डायट ) संगमनेर, जि. अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक तालुक्यात वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजित केले आहे. या प्रशिक्षणामूळे वटपौर्णिमाच्या दिवशी सुट्टी नसल्याने महिला शिक्षिकेंनी अनोख्या पद्धतीने वटपौर्णिमा साजरी करत आपल्या पतींसाठी दीर्घायुष्य चिंतले.

प्रशिक्षण संस्थेने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील ज्या शिक्षकांचे १२ वर्ष पूर्ण सेवा झाली त्यांना वरिष्ठ व २४ वर्ष सेवा पूर्ण झाली त्यांना निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण महाराष्ट्रभर २ जून ते १२ जून पर्यंत आयोजित केले आहे. अगस्ती कला वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय येथे हे प्रशिक्षण सुरु आहे. या प्रशिक्षणात वेगवेगळे दिन विशेष साजरे केले जातात.

५ जून रोजी पर्यावरण दिन वृक्षारोपण करून साजरा केला. मंगळवारी वटपौर्णिमेचे औचित्य साधून महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून वटपौर्णिमा साजरी केली. यावेळी रेखा कांबळे यांनी ‘मी सावित्रीबाई फुले बोलते.’ हे स्वागत गीत सादर केले. यात त्यांनी सावित्रीबाई फुले आज असत्या तर त्यांनी कोणते प्रश्न हाताळले असते याची जाणीव सर्वांना करून दिली. सुलभक दीपक पाचपुते यांनी आजच्या स्त्रीयांचे ज्वलंत प्रश्न यावर मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता प्रा. अरुण भांगरे व तालुका समन्वयक विस्ताराधिकारी सविता कचरे उपस्थित होते. यावेळी शिक्षकांतर्फे सर्व महिला शिक्षिकेंना पेन व गुलाबपुष्प देऊन त्यांचा सत्कार केला.

# वटपौर्णिमा, वृक्षमैत्रीचा संदेश देणारा सण : जाखडी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



वटपौर्णिमा म्हणजे वृक्षमैत्रीचा संदेश देणारा जगातील एक अनोखा सण आहे. जो वृक्ष वाढवतो तो स्वतःच्या तसेच समाजाच्याही जीवनातील आनंद वाढवतो. आरोग्याचा स्तर उंचावतो. म्हणून वटपौर्णिमा सणाचे औचित्य साधून वृक्षारोपण मोहीम प्रत्येकाने योगदान देऊन वाढवली पाहिजे आणि भावी पिढ्यांच्या सुखी जीवनाची मुहूर्तमेढ रोवली पाहिजे असे प्रतिपादन पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी केले.

वटसावित्री पौर्णिमेनिमित्त शहरातील सुतार गल्लीतील पुरोहित प्रतिष्ठानच्या कार्यालयात महिलांसाठी वटवृक्ष पूजनाचा विधीवत सोहळा आयोजित करण्यात आला होता. वेदमंत्रांच्या घोषात शास्त्रशुद्ध रीतीने वडाची विधीवत यथासांग पूजा महिलांच्या हस्ते करण्यात आली. त्यावेळी उपस्थित भगिनींना मार्गदर्शन करतांना जाखडी बोलत होते. या सोहळ्यात विविध समाजांच्या सामजिक कार्य करणाऱ्या महिला मंडळातील सदस्या सहभागी झाल्या होत्या. वटवृक्षाचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले असंख्य फायदे अभ्यासल्या नंतर आपल्या पूर्वजांनी वटवृक्ष जतन करणे, वृद्धिंगत करणे या हेतूने वटपौर्णिमा व्रताचा अंगीकार केला. सत्यवान आणि सावित्रीच्या कथेतून हाच संदेश देण्यात आला आहे की, मोठ्या प्रमाणात प्राणवायू देणारा जीवदान देण्याची क्षमता असलेला हा वृक्ष मानवाला वरदान आहे. अनेक वर्षांपासून सदर उपक्रमास भगिनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देतात. त्यांनी पूजन केलेले वटवृक्षाचे रोप त्यांच्याच हस्ते अनेक ठिकाणी लागवड करण्यात येते. त्यामुळे मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे सहजपणे शक्य झाले आहे. नारीशक्ती किती किमया करू शकते हे यातून दिसून आले आहे.


**A ORNATE FFINE DECOR**

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदाचे नाव | जागा |
| --- | --- | --- |
| 1. | फर्निचर कामाकरिता सुपरवायझर | 2 |
| 2. | कॉम्प्युटर ऑपरेटर | 2 |
| 3. | हेल्पर | 2 |

पत्ता : निंबाळे रोड, समनापुर, गणपती मंदिराजवळ, समनापुर , संगमनेर . मोबाईल - 97 67 04 18 99

कोथमिरे त्रिशुल छाप मसाले ॲग्रो प्रोडक्टस् कंपनीकरीता

चवीला खरे कोथमिरे! कोथमिरे SINCE 1992

**ड्रायव्हर पाहिजेत**

1) कार ड्रायवर- 1 जागा

2) कमरशियल ड्रायव्हर-1 जागा

(सर्व गाड्यांचे ज्ञान, लायसन आवश्यक) अनुभव कमीत कमी ५ वर्षे

निरव्यसनी, प्रामाणिक व होतकरु इच्छुकांनी संपर्क साधावा.

आकर्षक पगार व सुविधा उपलब्ध

पत्ता- १८५६, वेल्हाळे रोड, गुंजाळवाडी, संगमनेर

मोबाईल क्र. ९९७०२९५३८६, ९५६११११५८५




MALPANI

प्रोसेस विभागात

**कामगार भरती**

चालू आहे!

वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,

पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,

नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)

पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व

ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती

सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-

अधिक माहितीसाठी संपर्क

मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी

मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

मो. ८९५६९५६६१२

मो. ९८२२६०१६५२

मो. ९५५२८८१३००


‘बांधिलकी जनहिताची नायक’ हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टॅंडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

**पाहिजेत**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024









# सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय!

## पाण्यापासून वंचित गावांचे होणार सर्वेक्षण :आ.खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



तालुक्याच्या साकूर पठार भागातील दिर्घकाळ प्रलंबित पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुंबईत जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत जलसंपदा विभागाने बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय समोर आणला आहे. या माध्यमातून साकूर पठार भागाचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागणार असून, गेल्या अनेक वर्षांपासून पाण्यावाचून वंचित असलेल्या पठार भागाला दिलासा मिळणार आहे.

या बैठकीला आमदार अमोल खताळ, भाजपा तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य रऊफ शेख, रवी दातीर, ॲड. अमित धुळगंड यांच्यासह शिष्टमंडळ उपस्थित होते. संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील मोरवाडी धरणाच्या संदर्भात अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांची मागणी होती. याआधी भूसंपादनही झाले होते, मात्र धरण न झाल्याने जमीन शेतकऱ्यांना परत देण्यात आली होती. २००४ मध्ये तत्कालीन पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी कोणाच्या सांगण्यावरून न्यायालयाला पत्र देऊन जायकवाडीच्या खाली कुठलेच धरण होणार नाही असे लेखी हमीपत्र राज्य शासनाच्या वतीने दिले गेले. परंतु साकुर पठार भागासह तालुक्यातील पाणी प्रश्न कोणत्याही परिस्थितीत सोडवायचा असल्याने आमदार अमोल खताळ यांनी यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आग्रह धरला आहे. यानुसार संगमनेर तालुक्याच्या साकुर पठार भागासह तालुक्यातील निमोण व तळेगाव या सर्व दुष्काळी भागाचे नव्याने सर्वेक्षण करून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली. तसेच सर्वेक्षण अहवाल आल्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर पुन्हा एकदा बैठक घेऊन या भागातील पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी दिला असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

या बैठकीत मोरवाडी धरणाच्या संदर्भात चर्चा करण्यात आली, मात्र मोरवाडी धरण होऊ नये यासाठी मागच्या लोकप्रतिनिधींनी खोडे घालून ठेवले होते, त्यामुळे आजपर्यंत ते धरण झाले नाही. मात्र मोरवाडी धरण झाले पाहिजे ही आमची प्रमुख मागणी आहे. मात्र या परिसरातील सिंचनाचा प्रश्न सोडवण्यासाठी बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय पुढे आला आहे. हे बॅरेज बंधारे मोरवाडी, साकुर, जांबुत आणि शिंदोडी येथे बंधारे करण्याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. मंत्री विखे पाटील आणि आमदार खताळ यांच्या माध्यमातून पठार भागाचा सिंचनाचा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल असे भाजपाचे तालुकाध्यक्ष गुलाब भोसले यांनी सांगितले. तर रऊफ शेख म्हणाले, पहिल्याच अधिवेशनात साकूर पठार भागाचा पाणी प्रश्न आमदार अमोल खताळ यांनी विधान सभेत मांडला. त्यानंतर आमदार अमोल खताळ यांच्या विशेष प्रयत्नाने राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पठार भागाचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी काम करत असुन सरकारची आणि लोक प्रतिनिधींची मानसिकता सकारात्मक असल्याने लवकरच हा प्रश्न मार्गी लागेल असे सांगितले.

या बैठकीत आमदार अमोल खताळ यांनी साकुर पठार भागातील पाणी प्रश्न सुटण्यासाठी मोरेवाडी येथे लातुर पध्दतीच्या बरेज शृंखला करणे. (मोरेवाडी, जांबूत, साकुर, शिंदोडी),निमगाव भोजापुर धरणाच्या पुर पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन, धरणाची उंची वाढ इत्यादी पर्यायाचा उपयोग करुन तालुक्यातील सिंचना पासुन वंचित गावे जसे की, सोनोशी, नान्नज दुमाला इत्यादी गावांचा पाणी प्रश्न निकाली काढणे शक्य होईल. चिकणी येथे म्हाळुंगी नदीचे पाणी लिफ्ट करून तामकडा बंधाऱ्यात सोडणे बाबत, सावरगाव घुले (राहटीचा दरा) येथे छोटे धरण बांधणे बाबत, सायखिंडी येथे लिफ्टने पाणी देणेबाबत आढळा या प्रवरेच्या उपखोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध करणेसाठी अकोले तालुक्यातील बिताका येथून जलस्त्रोत्र उपलब्ध केल्यास आढळा लाभक्षेत्रात येणाऱ्या संगमनेर तालुक्यातील गावांना फायदा होऊ शकतो.

निळवंडे डावा व उजवा कालवा तसेच त्यावरील शाखा कालव्यांच्या लाभक्षेत्रात येत नसलेल्या गावांचा सिंचन विषयक पाणी प्रश्न प्राधान्याने सोडविणे बाबत, कोकणात वाहुन जाणारे पाणी प्रवरा व मुळा खोऱ्यात वळवुन उपलब्ध होणाऱ्या पाण्यातुन या भागाचा सिंचन विषयक पाणी प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याबाबत उपयोग करण्याबाबतच्या शक्यतेचा विचार करणे. (उदा- प्रवरा खोऱ्यातील हिवरा नाला, साम्रद नाला तसेच मुळा खोरे येथील पाथर घाट, सादाडा घाट, तोलार खिंड, खिरेश्वर इ. वळण योजना बाबत) आणि वाऱ्या डोंगरावरून वाहून जाणारे पाणी क-हे गावतळ्यात वळविणे बाबत आदी मागण्या केल्या.

■ या बैठकीत निमगाव भोजापूर धरणाची उंची, पाणी नियोजन, व्यवस्थापन संदर्भातही चर्चा झाली असून, त्यातून पाणी मिळवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. निळवंडे डावा व उजवा कालवा, तसेच राहठीचा दरा येथे धरण बांधण्याच्या बाबतही विचार सुरू आहे. तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत पाणी मिळणारच आहे असा ठाम विश्वास व्यक्त करतांना पाण्यापासून वंचित राहिलेल्या सायखिंडी, कऱ्हे व इतर सर्व गावाचा सर्वे करून भविष्यात एकही गाव पाण्यावाचून वंचित राहणार नाही, यासाठी जलसंपदामंत्री विखे पाटील आणि मी स्वतः प्रयत्नशील राहू असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

# वाहतूक नियम जनजागृती!

## पोलीस उपनिरीक्षक भारती यांचे मार्गदर्शन



**नायक वृत्तसेवा, अकोले**

वाहतूक नियम जनजागृती निमित्त वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व सुरक्षितता या संदर्भात अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अनिल भारती यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम, दंड, कायदेशीर कारवाई, सुरक्षितता, वाहतुकीचे

नवीन नियम व सुधारणा याबद्दल सखोल माहिती दिली. ट्रॅफिक नियम म्हणजे रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्यासाठीचे नियम. या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, जेणेकरून अपघात टाळता येतील व वाहतूक व्यवस्था व्यवस्थित राहील. त्याचबरोबर १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांनी वाहने चालवू नयेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर नवले व सर्व संचालक मंडळाने शाळेत राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता सोलापुरे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी 'रहदारीच्या नियमाची नव्हे ही सक्ती...ही तर सुरक्षित जीवनाची गुरुकिल्ली' असा महत्त्वाचा संदेश उपस्थित विद्यार्थ्यांना यावेळी दिला.

# माजी मंत्री थोरात यांच्यामुळे मुळा नदीवर विविध बंधारे!

## नवीन लोकप्रतिनिधींनी अभ्यास करावा : ढेरंगे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

पठार भागाला वरदान ठरणाऱ्या मुळा नदीवर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून ठिकठिकाणी केटीवर व बंधारे बांधण्यात आले आहेत. मोरवाडी धरणासाठी ही त्यांचा सातत्याने पाठपुरावा राहिला आहे. नवीन लोकप्रतिनिधींनी अगोदर तालुक्यातील गावांचा अभ्यास करून बोलले पाहिजे असे मत संगमनेर तालुका असंघटित कामगार संघटनेचे अध्यक्ष जयराम ढेरंगे यांनी व्यक्त केले.

याबाबत ढेरंगे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, नवीन लोकप्रतिनिधींना अजून गावे माहिती नाहीत. काम माहिती नाही. फक्त हे करणार ते करणार या घोषणाबाजी सुरू आहेत. बाळासाहेब थोरात यांनी गावोगावी विकासाच्या योजना राबवल्या आहेत. पठार भाग अनेक वर्ष अकोले विधानसभा मतदारसंघाला जोडलेला होता तरीही या भागात विकासाच्या योजना ह्या माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनीच राबवल्या. याचबरोबर मुळा नदीवर ठिकठिकाणी केटीवर व बंधारे बांधून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले. मोरवाडी धरणासाठी ही त्यांनीच पाठपुरावा केला. २००४ ला माजी मंत्री बाळासाहेब थोरात कृषी मंत्री होते, त्यावेळेस सध्याचे जलसंपदा मंत्री ही मंत्री होते. समन्यायी पाणी वाटपाला विरोध हा पहिला माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केला तर संगमनेर मधून तीव्र मोठे आंदोलन करत निषेध नोंदवला यावेळी सध्याचे मंत्री गप्प बसून होते.

नवीन लोकप्रतिनिधींना काही लोक चुकीची माहिती देत असून त्यांनी अगोदर तालुक्याचा अभ्यास करावा, गावोगावी भेट द्यावी मगच जाहिरात बाजी करावी असा टोलाही त्यांनी लगावला. २००५ च्या समन्यायी पाणी वाटप कायद्याला माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सर्वप्रथम विरोध केला. जायकवाडीला पाणी सोडू नये याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी मंत्री स्व. मधुकर पिचड यांच्या नेतृत्वात संगमनेर मध्ये भव्य आंदोलन केले गेले. त्यावेळी सध्याचे जलसंपदा मंत्री गप्प होते, ते या आंदोलनात सहभागी झाली नव्हते आणि



त्यांनी कोणतीही भूमिका मांडली नव्हती अशी टीका ॲड. अशोक हजारे यांनी केली. भोजापुर धरणातून संगमनेर तालुक्यातील गावांना पाणी मिळावे यासाठी कारखान्याच्या माध्यमातून माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दरवर्षी भोजापुर चारीची दुरुस्ती केली आहे. याचबरोबर शासनाच्या माध्यमातून या चारीसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. निमोण व पाच गावांना ग्रॅव्हिटीद्वारे पाणी मिळावे याकरता पाणीपुरवठा योजना राबवली आहे.या कामांमुळे संगमनेर तालुका हा राज्यात प्रगतीचा ठरला आहे.

थोरात यांनी अविश्रांत काम करून गावागावात विकासाच्या योजना राबवल्या. आज संगमनेर तालुका सहकार, शिक्षण, समाजकारण, आर्थिक समृद्धी मध्ये राज्यात अग्रगण्य आहे. इतर तालुक्यांची तुलना केली तर संगमनेर हा समृद्ध तालुका दिसतो. हे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वामुळेच झाले आहे. जगात सर्वात सोपे नावे ठेवणे आणि सर्वात अवघड काम करणे असल्याचा टोला कारखान्याचे संचालक इंद्रजीत खेमनर यांनी विद्यमान लोकप्रतिनिधींना लगावला.

नायक ANCHOR

# एसएमबीटीत आज पोट विकार तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

SMBT HOSPITAL

शहरानजीकच्या घुलेवाडी येथील एसएमबीटी क्लिनिक येथे आज शुक्रवार दि.१३ जून रोजी पोटविकार तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आज शुक्रवारी सकाळी १० ते २ यावेळेत हे शिबिर पार पडणार असून मोफत नाव नोंदणी केली जाणार आहे. यावेळी तज्ञ गॅस्ट्रो इंट्रोलॉजिस्ट यांचा मोफत सल्ला रुग्णांना दिला जाईल. त्याचबरोबर अल्प दरात एन्डोस्कोपी, कोलोनोस्कोपी, ईआरसीपी व इतर चाचण्या करण्यात येणार आहेत. तसेच पोटाच्या सर्व समस्या जसे, पोटामध्ये वेदना होणे, गिळायला त्रास होणे, गिळता न येणे, अचानक वजन कमी होणे, भूक कमी लागणे, छातीमध्ये व पोटामध्ये जळजळ होणे, वारंवार अतिसार (डायरिया) होणे, बद्धकोष्टता, कावीळ, काळी संडास, संडासातुन रक्त येणे, पित्ताशयातील खडे व पित्त नलिकेतील खडे, यकृताचे विकार, स्वादुपिंडाचे विकार, पोटातील आतड्याला सूज येणे, उलट्या व रक्ताच्या उलट्या होणे आदी आजारांवर व समस्यांवर खात्रीशीर उपचार होणार आहेत.

■ या शिबिरात उपस्थित राहणाऱ्या रेशन कार्ड धारकांसाठी महात्मा फुले जन आरोग्य व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तसेच नामांकित कंपन्यांची औषधे सवलतीच्या दरात उपलब्ध होणार आहेत.







